# महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण

(महाराष्ट्र शासनाची संस्था)

कोल्हापूर विभागीय कार्यालय

वि.का.को./समाजकल्याण/एस-१६/२०१९-२०/ 1164 दिनांक- ०७/०२/२०२०

प्रति,
मे. अथर्व टेक्नोसिस्टिमस्,
ऑफीस नं. ०१, प्लॉट नं. ३७, गट क्र. १३५,
प्रथमेश नगरी, देवराई रोड, औरंगाबाद
जि. औरंगाबाद-४३१००५

विषय- मे. अथर्व टेक्नोसिस्टिमस्, औरंगाबाद या कंपनी/फर्मचे नांव काळया यादीमध्ये समाविष्ट करण्यात येत असलेबाबत...

संदर्भ- १. या कार्यालयाकडील कार्यादेश क्र. MEDA KOP/SPV Power Plant/On-grid/२०१८-१९/Sangli/४२ dated १७/०१/२०१९

२. या कार्यालयाची नोटीस क्र. वि.का.को./समाज कल्याण/एस-१६/२०१९-२०/११३५ दि. २०/०१/२०२०

३. आपले पत्र क्र. निरंक दि. २२/०१/२०२०

४. या कार्यालयाचे पत्र क्र. वि.का.को./समाजकल्याण/एस-१६/२०१९-२०/११५३ दिनांक- ०४/०२/२०२०

समाज कल्याण विभाग, सांगली अंतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन (संकूल), १५ शासकीय वसतीगृह व ०६ निवासी शाळा या सर्व इमारतींवर एकूण २६१.५ कि.वॅ. क्षमतेचे पारेषण संलग्न सौर विद्युत प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठीचे कार्यादेश संदर्भ क्र. १ अन्वये आपणास देण्यात आले होते. परंतू आपणास दिलेल्या कार्यादेशानुसार कोठेही प्रकल्पाचे काम मुदतीत पुर्ण केले नाही. याबाबत वारंवार विचारणा व पत्रव्यवहार होऊन देखील आपण समाधानकारक प्रगती दाखविली नाही. यासंदर्भात प्रत्येक वेळी खोटी आश्वासने, आर्थिक आणि वैयक्तिक अडचणी पुढे करत आपणाकडून या कार्यालयाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला गेला आहे. त्यामुळे समाज कल्याण विभाग, सांगली यांनी महाऊर्जाकडे उपरोक्त प्रकल्पासंबंधी विश्वासाने सोपविले काम वेळेत पुर्ण करता आले नाही.

आपण सदर कामापोटी दाखविलेला निष्काळजीपणा आणि काम होत असल्याचे जाणिवपूर्वक भासवून प्रकल्पाचे काम प्रदीर्घ काळाकरिता प्रलंबीत ठेऊन या कार्यालयाची फसवणूक केली आहे. शिवाय या कार्यालयाकडून संदर्भ क्र. २ अन्वये दिलेली कारणे दाखवा नोटीसीला आपणाकडून संदर्भ क्र. ३ अन्वये प्रतिसाद देताना सदर प्रकल्पाचे काम दुसऱ्या कंत्राटदारास देत असल्याचे या कार्यालयास कळविले आहे. तेव्हा वरील नमूद ठिकाणी आपण प्रकल्पाचे काम करण्यास असमर्थ असल्याचे सिध्द केले आहे. शिवाय सदर काम आपण इतर कंत्राटदाराकडे सोपवत असल्याने निविदेतील अटी-शर्तीचा देखील भंग आपणाकडून झाला आहे. अशाप्रकारे आपणाकडून या कार्यालयाची फसवणूक व दिशाभूल केली गेली

C:\Users\HP\Desktop\VMT\sangli\All letter sangli.docx

विभागीय कार्यालय : सि.स.नं. २४९/अ-१/५५, ई-वार्ड, म्हाडा कॉम्प्लेक्स, नागाळा पार्क, जिल्हा परिषदेजवळ, कोल्हापूर - ४१६ ००३
E-mail : medakolhapur@mahaurja.com दूरध्वनी व फॅक्स : ०२३१ - २६८०००९

असल्याने भविष्यात आपणास अपारंपरिक ऊर्जा प्रकल्पासंबंधी कोणतेही काम दिले गेल्यास कार्यालयाची अडचण व बदनामी होऊ शकते. याकरता मे. अथर्व टेक्नोसिस्टिमस्, औरंगाबाद या कंपनी/फर्मचा काळया यादीमध्ये समावेश करण्यात आला आहे. यामुळे भविष्यात आपणास अपारंपरिक ऊर्जा प्रकल्पांतर्गत जाहीर करण्यात येणाऱ्या कोणत्याही निविदा अथवा तद्अनुषंगिक कामामध्ये सहभागी होता येणार नाही, याची नोंद घ्यावी.

विभागीय महाव्यवस्थापक,
महाऊर्जा, विभागीय कार्यालय, कोल्हापूर

**प्रत- माहितीस्तव सविनय सादर**

१) मा. जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली, जिल्हा सांगली

२) मा. प्रादेशिक संचालक,
प्रादेशिक कार्यालय महाऊर्जा,
ऑफीस क्रं. १०८-१०९, हर्मेस सेंटर,
येरवडा शास्त्रीनगर, पुणे -४११००६

३) मा. सहाय्यक आयुक्त,
समाज कल्याण विभाग, सांगली,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन,
समाज कल्याण, सांगली.

C:\Users\HP\Desktop\VMT\sangli\All letter sangli.docx